# प्राचीन ते आधुनिक कालखंडातील स्त्रियांचा सामाजिक दर्जा-एक समाजशास्त्रीय अध्ययन

शोधपत्र-समाजशास्त्र

*कु. महानंदा राऊतखेडकर

**प्रस्तावना :-** प्राचीन कालखंडाचा, इतिहासाचा विचार करता स्त्रियांचा दर्जा हा उच्च असलेला दिसतो. कारण स्त्रिच कुटूंबाचा केंद्रबिंदू होती. प्राचीन कुटूंब व्यवस्था ही मातृसत्ताक कुटूंबव्यवस्था होती. परंतु, कालांतराने यात परिवर्तन होऊन पितृसत्ताक कुटूंबव्यवस्था अस्तित्त्वात आली. स्त्रियांचे अधिकार, सत्ता पुरूषांच्या हातात केंद्रित झाल्याने आपोआपच स्त्रियांचा दर्जा हा दुय्यम ठरला. परंतु, आजदेखील भारतात दक्षिण भागात मातृसत्ताक कुटूंबपद्धती आढळून येते. तेंव्हा प्राचीन ते आधुनिक कालखंडातील स्त्रियांच्या दर्जाचा अभ्यास पुढील कालखंडाच्या संदर्भात करता येईल.

**कार्यक्षेत्र व संशोधन पद्धती :-** प्रस्तुत शोध निबंधासाठी कोणत्याही विशिष्ट शहराची मर्यादा न ठेवता उपलब्ध झालेल्या दुय्यम तथ्य सामुग्रीद्वारा विविध ऐतिहासिक कालखंडाच्या संदर्भात मूल ग्रंथ, तज्ज्ञांचे, विचारवंताचे लिखाण हे कार्यक्षेत्र निश्चित केले आहे. तसेच, दैनिक पत्रिका, स्त्री विशेषांक, मासिके, स्त्रीसंबंधी पत्रिका, शोध निबंध, वैचारिक लेख या सर्वांचा आधार घेण्यात आला आहे.

**संशोधन आराखडा :-** प्रस्तुत शोध निबंधासाठी वास्तविक तथ्यांच्या आधारावर वर्णनात्मक विवेचन करता यावे म्हणून वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आला आहे.

**उद्देश :-** प्रस्तुत शोध निबंधासाठी पुढील उद्देश ठरविण्यात आलेले आहेत. १) प्राचीन ते आधुनिक कालखंडापर्यंत स्त्रियांच्या सामाजिक दर्जाचे अध्ययन करणे. २) प्राचीन ते आधुनिक कालखंडापर्यंत स्त्रियांच्या सामाजिक दर्जात होत असलेल्या परिवर्तनाचे अध्ययन करणे.

**व्याप्ती व मर्यादा :-** प्राचीन ते आधुनिक हा ऐतिहासिक कालखंड अत्यंत विस्तृत व व्यापक असून प्रस्तुत शोध निबंधात केवळ स्त्रियांच्या सामाजिक दर्जाच्या संदर्भात संक्षिप्त अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे.

**वैदिक कालखंड :-** इ.स. ६०० पर्यंतचा हा कालखंड मानला जातो. भारतीय समाजाचा व म्हणूनच भारतीय स्त्री जीवनाचा इतिहास वेदकाळापासून सुरू होतो. वेदकालीन स्त्रियांचे जीवन अतिशय मानाचे, उच्च दर्जाचे व सन्मानपूर्वक होते. स्त्रियांनाही बौद्धिक व आध्यात्मिक अधिकार होते. मुलांप्रमाणेच मुलींचेही उपनयन होत असे. ब्रह्मवादिनी व सद्योद्वाहा असे विद्यार्थीनींचे दोन प्रकार होते. ब्रह्मवादिनी स्त्रिया आजन्म ब्रह्मचर्य पाळीत असत. त्या वेदविद्या आणि ब्रह्मविद्या शिकत. पठणाशिवाय त्या स्वतंत्रपणे लेखनही करीत. डॉ.ए.एस.आळतेकरांच्या मते, "ब्रह्मवादिनी आयुष्यभर विद्यार्थीनी असत." त्यांच्यापैकी काहीजणी आपली ज्ञानसाधना अबाधितपणे चालावी म्हणून अविवाहित रहात असत असेही ते नोंदवतात.

"Harita prescribes that in the case of women samavartana took place before the appearance of mense. Therefore, Brahmavadini women had upanayana performed in the 8 years from correction that they studied vedic lore and finished studenthood at the large of puberty"[१] याचा अर्थ ब्रह्मवादिनींनाही वेदाध्ययनासाठी पाच-सहा वर्षेच मिळत होती.

सद्योद्वाहा विद्यार्थीनी सोळाव्या वर्षापर्यंत शिक्षण घेऊन मग अनुरूप पतीशी विवाहित होत. विवाहानंतर पत्नी म्हणून स्त्रीचे स्थान फार उच्च असे. गृहस्थाला पत्नीवाचून यज्ञाचा अधिकार नसे. यज्ञात पत्नीचा फार महत्त्वाचा वाटा असे. सीतायज्ञ, रुद्रबली, रूद्रयाग यासारखे यज्ञ फक्त स्त्रियांनीच करायचे असत. याचा अर्थ स्त्रीशिवाय गृहस्थाला गृहस्थपणच येत नसे[२]. वैदिक कालखंडात विवाहाच्या बाबतीतही स्त्रियांना स्वातंत्र्य होते. डॉ.बेनी प्रसाद यांच्या मतानुसार, "बहुधा जवान स्त्री-पुरूष आपस में मिला जुला करते थे, अपनी रूचिके अनुसार प्रेम करते थे, और अपनी पसन्द के अनुसार एक दुसरे से ब्याह कर लेते थे |"[३]

वेदकाळाचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे, विधवा स्त्रियांना त्यांच्या पसंतीने दुसरा विवाह करण्याची अनुमती होती. डॉ. रामस्वामी अय्यर यांच्या मते, विधवा स्त्रिला मनाजोगा पती निवडण्याचे स्वातंत्र्य होते व हा अधिकार पतीच्या घरची मंडळी देत. हे पुढील विधानावरून स्पष्ट होते. "We have noted that, even among polyandrous people a women is married ceremonially to one man only, though she is shared by many on the death of that man, she passess automatically to the younger brothers, who claim compensation it she wishes to marry outside her husband's family"[४] वैदिक एकसूत्री व समानसूत्री स्वरूप असल्यामुळे त्यांना स्वातंत्र्य होते.[५] तसेच विविध ललित कलांचा अभ्यास स्त्री व पुरूष करत. विविध कलांचे शिक्षण घेणे फार आवश्यक समजले जाई. तसेच वेदकालीन बऱ्याच स्त्रीया सुशिक्षित होत्या.

* संशोधक विद्यार्थीनी, समाजशास्त्र विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड [ महाराष्ट्र ]

काहींना अध्यापनाचे कार्य करावे लागे. "स्त्रिया स्वतंत्रपणे अध्यापनाचाही धंदा करीत 'आचार्याणी' या संज्ञावरून स्पष्ट होते. आत्रेयी कामंदकी यांसारख्या मुली परगावी विशिष्ट शिक्षणासाठी राहून मुलांच्या बरोबरीने शिकत" म्हणजेच पुरूषाप्रमाणेच स्त्रियांही अध्यापन व्यवसायात होत्या.[६] अशा प्रकारे वैदिक कालखंडात स्त्रियांचा एकुणच सामाजिक दर्जा उच्च होता.

**सूत्रकाळ :-**या कालखंडात स्त्रियांचा समाजातील दर्जा खालावला. वेदाधिकाराला नकार आणि धर्मकर्माचा संचार यामुळे शुद्रांच्या बरोबरीने स्त्रीदेखील या कालखंडात शुद्रच ठरविली गेली. या काळात स्त्रीचे स्थान केवळ भोगदासीचेच होते. "स्त्रियांकडे पाहण्याचा आर्येतरांचा दृष्टीकोन आर्य हळूहळू स्वीकारू लागले. त्यामुळे बहुपत्नीकत्व, नियोग यासारख्या स्त्रीयांचे हीनत्त्व सिद्ध करणाऱ्या चाली आर्य समाजात निर्माण झाल्या. सूत्रकाळी स्त्रियांचा दर्जा हीन झाला याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे या सुमारास त्यांना वेदपठणाला व यज्ञकर्माला अनाधिकारी ठरविण्यात आले, हे होय"[७] वेदभ्यासाचा अधिकार नसल्यामुळे स्त्रियांच्या बाबतीत उपनयनाला केवळ औपचारिक स्वरूप प्राप्त झाले. "उपनयन हा संस्कार काढून घेण्यामागचा उद्देश हा की, स्त्रीने पुरूषांच्या संगतीत येऊ नये असाच वाटतो"[८]. वेदकाळी एकट्याने यज्ञ करणारी, वेदसुक्ते रचणारी व ब्रह्मवादिनी म्हणून गौरविली गेलेली स्त्री स्मृतिकालात अविद्या ठरली. म्हणून मनुने पुरूषाला आई, बहिण, मुलगी यांच्यापासूनही सावध राहायला सुचवले आहे. दुर्गुणांची केवळ खाण अशा स्त्रीवर कोणाचे तरी नेहमी दडपण असणे जरूर आहे, असे सांगताना मनू म्हणतो,

**पिता रक्षति कौमारे भर्ता | रक्षति यौवने |**
**रक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातन्त्र्यमर्हति ||**[९]

म्हणजेच स्त्रीचे रक्षण लहानपणी पिता करतो, तरूणपणी पती व म्हातारपणी पुत्र करतात. कारण स्त्री स्वतंत्र राहण्यास पात्र नाही. अशाप्रकारे स्मृतिकाळात स्त्री पारतंत्र्यात होती. याचाच परिणाम म्हणून पुर्नविवाहाची पद्धत मनुस्मृतीच्या काळी बंद पडली. रामायण व महाभारत कालखंडात काही स्वतंत्र व कर्तबगार स्त्रियांचे आदर्श चित्रित केलेले असले तरी या स्त्रिया बहुतेक क्षत्रिय वर्णातल्या आहेत. उत्तरेसारख्या क्षत्रिय मुली कलांचे शिक्षण घेत. सावित्री-दमयंती सारख्या मुली स्वयंवर करीत. कैकेयी, द्रोपदी, ओडिसाची त्रिभुवनदेवी यांचे आजही नाव घेतले जाते.[१०]

**बौध्द कालखंड :-** गौतम बुद्धांनी 'स्त्रियांना निर्वाणाचा म्हणजे मोक्षाचा अधिकार असल्याचे मान्य केले होते'[११]. बौद्ध धर्माने स्त्रियांना ज्ञान-आत्मज्ञान प्राप्त करून घेण्याची संधी मिळवून दिली. व्यक्तिगत स्वातंत्र्याला महत्त्व दिले आणि सामाजिक रूढींना विरोध केला. त्यासाठी त्यांनी स्त्रियांना अधिकार दिले. तसेच संसारत्याग करून मुक्त जीवन जगण्याचा अधिकार दिला. पुढील विधानावरून स्पष्ट होते. "तथागत ने इस प्रकार एक क्रांति ही नहीं की, वरना भारतीय स्त्रीयोंको मुक्ती भी दिलायी"[१२]. सम्राट अशोकापासून ते राजा हर्षवर्धनापर्यंत या धर्माला आधार देणारे राजे महाराजे झाले. तरी देखील भारतात इसवी सनाच्या आठव्या शतकापासून बौद्ध धर्माला उतरती कळा लागली. बुद्धकाळातले स्त्रियांचे स्वातंत्र्य फार काळ टिकले नाही. म्हणजेच स्त्रियांना प्राप्त झालेले धार्मिक, व्यावहारिक आणि आध्यात्मिक स्वातंत्र्य धोक्यात आले. अशा पद्धतीने स्त्रियांची दुर्दशा पुढे वाढतच गेली. पुढे स्त्रिया ब्राह्मणी कर्मकांडाला बळी पडत गेल्या.

**मुस्लिम कालखंड :-** इ.स.अकराव्या शतकापासून भारतावर मुसलमानांची आक्रमणे सुरू झाली. त्यामुळे हिंदू स्त्रियांचे राहिलेले थोडेफार स्वातंत्र्यही नष्ट झाले. मुसलमान राज्यकर्त्यांच्या वाकड्या नजरापासून संरक्षण करण्यासाठी हिंदू लोक आपल्या मुलींना व स्त्रियांना पडद्याआड लपवून ठेऊ लागले. "परक्या पुरूषांच्या नजरेला पडू नये म्हणून कुलीन स्त्रियांनी आपल्या मुखासह सर्व शरीर झाकून घेण्याच्या पद्धतीला पडदा पद्धती म्हणतात."[१३]

पुढे मुसलमानी साम्राज्याचा अस्त झाला; पण बालविवाह व पडदा यासारख्या दुष्ट चाली त्यांच्याबरोबर गेल्या नाहीत. त्या एकदा ठाण देऊन बसल्या त्या बसल्याच. समाजव्यवस्था अधिकाधिक धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्या बंदिस्त बनवली हे पुढील विधानावरून लक्षात येईल. "मुसलमानांच्या स्वाऱ्या आणि अंमल भारतवर्षात सुरू झाल्यापासून स्त्रियांच्या सामाजिक जीवनाला उतरती कळा लागली. कित्येक घरातून गोषा आला आणि उजळ माथ्याने समाजात वावरण्याची मोकळीक स्त्रियांना राहिली नाही. त्यामुळे समाजाच्या सांस्कृतिक आणि राजकीय जीवनातही अस्वस्थता निर्माण झाली[१४]. यावरून असे लक्षात येते की, स्त्रीयांवरील सामाजिक, धार्मिक निर्बंध अधिक कडक केले गेले. परंपरावादी विचारसरणी जोपासली जात होती. स्त्रियासंबंधी अनेक अनिष्ठ प्रथा प्रचलित होत्या, त्यात पडदापद्धती, बालविवाह, अंतर्विवाह, सतीप्रथा, केशवपन, बहुपत्नीत्वप्रथा, पुर्नविवाहाला मज्जाव या प्रथांचा समावेश होता. रज़िया बेगम, चांद बिबी, ताराबाई, अहिल्याबाई, झाशीची राणी, दुर्गावती, राणी चेन्नमा, पद्मीनी, कृष्णाकुमारी, इत्यादींनी शासन चालवण्यात उत्कृष्ट कामगिरी केली परंतु या अपवादात्मक उदाहरणावरून सर्वसामान्य स्त्रियांची स्थिती उच्च होती असे म्हणता येणार नाही.

शिवकाळात कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात अद्वितीय कार्य करणाऱ्या स्त्रिया या कालखंडात झाल्या. यात राजमाता जिजाबाई, महाराणी येसूबाई, महाराणी ताराबाई इत्यादींचा त्यात समावेश होता. परंतु नंतर पेशवेकाळात स्त्रिया बंदिस्त जीवन जगत होत्या, हे पुढील विधानावूरन लक्षात येते. "वेदाध्ययन, धार्मिक संस्कार, ज्ञानादिपासून या काळात स्त्रीला वंचित ठेवले होते. ब्राह्मणी धर्मात कर्मकांडाचा सुळसुळाट माजला होता. बालविवाह, बाला-जरठ विवाह सर्रास होत. खुद्द पेशवाईतील काही महत्त्वपूर्ण व्यक्तींचे विवाह असेच झाले. नवरा प्रौढ आणि नवरी मुलगी बालिका असे. पति निधनानंतर सती जाणे आवश्यक समजले जात होते[१५]. म्हणजेच याही कालखंडात स्त्रियांचा दर्जा दुय्यमच असल्याचे आपणांस दिसते.

**ब्रिटिश कालखंड :-** इ.स.१८१७ ते १८१८ साली पेशवाईचा शेवट झाल्यानंतर ब्रिटिशांनी भारतात सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. याच कालखंडात १८२८ साली राजा राममोहन रॉय यांनी सतीबंदीचा कायदा करून स्त्रियांना जीवन जगण्याचा अधिकार दिला. या कालखंडात पाश्चात्त्य शिक्षण घेतलेला समाजसुधारकांचा एक मोठा वर्ग उदयाला आला. "ब्रिटिश कालखंडात इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारत स्वतंत्र करण्यासाठी जे स्वातंत्र्यसंग्राम झाले, त्यात पुरूषांच्या बरोबर स्त्रियाही भाग घेऊ लागल्या. इ.स. १९२१ च्या असहकाराच्या लढ्यात, १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहात दांडी मार्चच्या वेळी, १९३२ च्या सविनय कायदेभंगाच्या लढ्यात, १९४२ च्या अखेरच्या चळवळीत हजारो स्त्रियांनी भाग घेतला. इ.स.१९२६ पासून मुथुलक्ष्मी रेड्डी सारख्या कर्तबगार स्त्रिया प्रांतिक कायदेमंडळात आपला प्रभाव पाडू लागल्या"[१६].

**स्वातंत्र्योत्तर कालखंड :-** "स्वातंत्र्यानंतरच्या ५५ वर्षात भारतीय स्त्री जीवनात अनेक क्रांतीकारक बदल घडून आले. त्यात भारतीय संविधानाने भारतीय स्त्रीला पुरूषाच्या बरोबरीने समान अधिकार व स्वातंत्र्य बहाल केले. संविधानाची भूमिका समताधिष्टित समाजरचना निर्माण करावयाची असल्याने स्त्रियांचा दर्जा उंचावण्यास पोषक वातावरण निर्माण झाले. त्याचबरोबर स्त्रियांकरीता अनेक पुरोगामी कायदे संमत केले आणि स्त्रियांच्या दर्जात सुधारणा होण्यास मदत झाली. अनेक कल्याणकारी योजनांचा स्वीकार केला गेला. तसेच स्त्री-पुरूषांना समान दर्जा मान्य करणे भाग पडले[१७]. तसेच, स्वातंत्र्यानंतर सर्व व्यवसायात व नोकऱ्यात मोठ्या प्रमाणावर स्त्रियांनी प्रवेश मिळवला आहे. विविध स्त्रीविषयक कायदे केलेले आहेत. परंतु, आपल्याला एक विसंगत चित्र दृष्टीस पडते. एकीकडे घटनेने दिलेली स्त्री-पुरूष समानता व दुसरीकडे समाजात व कुटूंबात होणारा अन्याय, हिंसाचार हे पुढील काही उदाहरणावरून स्पष्ट होईल. "रूपनदेवी बजाज या सनदी अधिकारी महिलेला बड्या पोलीस अधिकाऱ्याने केलेल्या विनयभंगाविरूद्ध न्याय मिळविण्यासाठी न्यायदेवतेचे ७ वर्षे पाय धरावे लागले. नयना सहानी या राजकारणात अग्रेसर स्त्रीला राजकीय पुढाऱ्याच्या वासनेची बळी गेली नाही म्हणून तिला कोंबडीसारखे तंदूरमध्ये जळावे लागले. रिंकू पाटील, अमृता देशपांडे या कोवळ्या मुलींना भर रस्त्यात पेटविण्यात आले. कोठेवाडीत ४-५ वर्षाच्या मुलीपासून तर ७० वर्षाच्या आजीवरही सामुहिक बलात्कार करण्यात आले. सातारा जिल्ह्यातील तेलगावात चर्मकार महिलेची विवस्त्र धिंड काढून तिला तशाच अवस्थेत ३ तास चावडीवर बसविण्यात आले. जळगाव, सातारा, मालेगाव वासनाकांडे, बीड जिल्ह्यात चौराहा येथे धनगर समाजाच्या महिलेवर झालेले अत्याचार, भंडारा जिल्ह्यातील खैरलांजी या छोट्याशा खेड्यात अमानुष हत्याकांड करण्यात आले"[१८] थोडक्यात, स्वातंत्र्योत्तर कालखंडात अशा प्रकारची स्त्रियांच्या सामाजिक दर्जाच्या संदर्भात विसंगत परिस्थिती पहावयास मिळते.

**निष्कर्ष :-**वैदिक कालखंडात स्त्रियांची सामाजिक स्थिती, दर्जा हा पुरूषांच्या बरोबरीचा होता. गार्गी, मैत्रेयी, घोषाला यासारख्या आदरणीय, अणुकरणीय ब्रह्मवादिनी ऋग्वैदिक कालखंडात होऊन गेल्या तरी सर्वसामान्य स्त्रीला शिक्षणाचा मार्ग फारसा खुला नव्हता हे स्पष्ट आहे. सूत्रकाळात, स्मृतीकालखंडात तर स्त्रियांवर अनेक बंधने लादण्यात आले होते. स्त्री ही भोगदासी बनली होती. त्यांना स्वातंत्र्य, समानता नाकारण्यात आली होती. म्हणूनच या कालखंडात स्त्रियांचा सामाजिक दर्जा अत्यंत दुय्यम ठरला गेला. बौद्ध कालखंडात स्त्रियांना निर्वाणाचा अधिकार व इतर स्वातंत्र्य देण्यात आले होते. परंतु, सर्वसामान्य स्त्रियांना ते मिळत होतेच असे म्हणणे धाडसाचे होईल. मुस्लिम कालखंड व मराठेशाहीचा कालखंड यांचा विचार करता सर्वसामान्य स्त्रियांच्या सामाजिक दर्जा पुरूषप्रधान संस्कृती, धार्मिक रूढी-परंपरा, स्त्रियांवरील अनेक बंधने यामुळे दुय्यम होता. ब्रिटिश कालखंड हा भारतीय स्त्रियांच्या दृष्टीने सर्वांगीण विकासासाठी मदत करणारा असा ठरला. स्त्रियांवरील अनेक बंधने सैल होऊन, वाईट प्रथा परंपरांना आळा बसण्यास मदत झाली असे म्हटले तरी बहूसंख्य स्त्रियांची स्थिती ब्रिटिश कालखंडातही सतीप्रथा, बालविवाह, विधवा पुर्नविवाह बंदी, शिक्षणाचा अभाव यामुळे अत्यंत वाईट झाली होती. स्वातंत्र्योत्तर कालखंडात स्त्रियांच्या सामाजिक दर्जाच्या कक्षा उंचावण्याची प्रक्रिया गतिमान होत गेली. तरीदेखील पुरूषप्रधान संस्कृतीत आजही स्त्रियांवर अत्याचार होत आहे.

## सन्दर्भ ग्रन्थ

१. Altekar A.S. (1962) "the position of women in Hindu civilization", Sudrial Jain Publisher, New Delhi १st edition, P.No. २९५ २. जोशी महादेव शास्त्री, होडारकर पद्मजा (संपा), १९७९, "भारतीय संस्कृतीकोश", खंड १०, पुणे, प्रकाशन भारतीय संस्कृतीकोश मंडळ, १ आवृत्ती, पृ ११७ ३. चांद एस.एम., १९९२, 'भारतीय संस्कृती का विकास', प्रकाशन - जयपूर प्रींटवेल, १ संस्करण, पृ.क्र.४४ ४. सी.पी.रामस्वामी अय्यर, १९६९, 'द कल्चरल हेरिटेज ऑफ इंडिया, पृ.३२१ ५. जोशी महादेवशास्त्री, होडारकर पद्मजा (संपा), १९७९, भारतीय संस्कृतीकोश खंड १०, पुणे, भारतीय संस्कृती कोश मंडळ प्रथमावृत्ती पृ.१९५ ६. रामकृष्ण दाते, चिं.ग.कर्वे, १९५१, सुलभ विश्वकोश, खंड-६ ७. भारतीय संस्कृतीकोश खंड १०, जोशी महादेवशास्त्री, पद्मजा होडारकर, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, प्रथमावृत्ती, १९७९, पृ.क्र.१९५ ८. साळुंके आ.ह.२००५, 'हिन्दु संस्कृती आणि स्त्री', लोकवाङ्मयगृह, मुंबई, ६ वी आवृत्ती, पृ.२० ९. जोशी महादेवशास्त्री, होडारकर पद्मजा (संपा), १९७९, भारतीय संस्कृतीकोश, खंड १०, पुणे, पृ.क्र.१९६ १०. कित्ता, पृ.१९७ ११. साळुंके आ.ह., 'हिंदु संस्कृती आणि स्त्री', मुंबई लोकवाङ्मयगृह, ६ वी आवृत्ती, पृ.२० १२. आंबेडकर भीमराव रामजी, १९६२, 'हिंदू नारी का उत्थान और पतन', भाषांतरकार श्री श्रीवर्धनजी, १ संस्करण, लखनऊ, पृ.२४, २५ १३. गर्गे स.मा.[संपा]) १९८९, भारतीय समाजविज्ञान कोश खंड ३, पृ.१९४ १४. बाबर सरोजिनी, १९६८, 'स्त्री शिक्षणाची वाटचाल', मुंबई, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, प्रथमावृत्ती, पृ. ७२ १५. लांजेवार ज्योती, "भारतीय समाज आणि स्त्री", २००५, पुणे, सुगावा प्रकाशन, १ आवृत्ती, पृ.२८ १६. जोशी महादेवशास्त्री, पद्मजा होडारकर [संपा]), १९७९, भारतीय संस्कृती कोश खंड १०, पुणे, भारतीय संस्कृती कोश मंडळ, पृ.क्र.१९७ १७. हाटे चंद्रकला १९८५, 'स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय स्त्रियांचा दर्जा, मुंबई, महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ, १ ली आवृत्ती, पृ. २१८ १८. चित्तेकर कमलाबाई (२००६), 'पुरूषप्रधान संस्कृतीतील स्त्री आणि तीचे स्थान' अग्निफुले स्मरनिका, ४ थे सत्यशोधकी साहित्य संमेलन, पृ.४८, ४९